# प्रेसनोट दि. ११.०५.२०२१

रामु पांडुरंग कोरे वय ४३ वर्ष तलाठी, तिसंगी, ता. कवठेमहांकाळ, सांगली यांना ६,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे आजोबांनी तक्रारदार व त्याची आई यांचे नांवाने केलेल्या बक्षीस पत्राची हक्क अधिकार पत्रकात नोंद धरणे करीता तिसंगी, ता. कवठेमहांकाळ येथिल तलाठी श्री. कोरे यांनी तक्रारदार यांचेकडे ९,०००/- रूपयेची लाच मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी इकडील कार्यालयाकडे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार काल दिनांक १०.०५.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये तलाठी कोरे यांनी तक्रारदार यांच्याकडे चर्चेअंती ६०००/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम दि.११.०५.२०२१ रोजी घेवून येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.११.०५.२०२१ रोजी तलाठी कार्यालय तिसंगी, ता. कवठेमहांकाळ येथे सापळा लावला असता रामु पांडुरंग कोरे वय ४३ वर्ष तलाठी, तिसंगी, ता. कवठेमहांकाळ, सांगली वर्ग-३ यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून ६०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने रामु पांडुरंग कोरे वय ४३ वर्ष तलाठी, तिसंगी, ता. कवठेमहांकाळ, सांगली वर्ग-३ यांचे विरुध्द कवठेमहांकाळ पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री सुहास नाडगौडा सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे सो पोलीस उप अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक, श्री गुरुदत्त मोरे, पोलीस निरीक्षक, तसेच पोलीस अंमलदार पोहेकॉ संजय संकपाळ, पो.ना. धनंजय खाडे, प्रितम चौगुले, चालक पोना पवार, सपोफौ रविंद्र धुमाळ, पोहेकॉ संजय कलकुटगी, सलीम मकानदार, पोकॉ अविनाश सागर यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in